International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.328
Vol.6 No.6 July–Aug 2019

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक लोकशाही विषयक विचार

**डॉ. योगीराज एस. उरकूडे**

राज्यशास्त्र विभाग, भगवंतराव कला महाविद्यालय, सिरोंचा

**प्रस्तावना**

गुलामाला तू गुलाम आहेस म्हणून सांग म्हणजे तो गुलामगिरी विरुद्ध बंड करून उठेल अशा प्रकारे वर्षानुवर्ष सामाजिक आर्थिक गुलामगिरीत जीवन जगणाऱ्या वंचित शोषित तसेच समाजातील दुर्बल घटक वर्गांना त्यांचे न्याय हक्क मिळवून देणारे दिनदलीतांचे कैवारी माणसाला माणूस म्हणून ज्यांनी जगण्याचा हक्क मिळवून दिला असे समतेची पुजारी महामानव भारतीय घटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म 14 एप्रिल 1891 ला मध्य प्रदेशातील महू येथे झाला. त्यांचे मूळ आडनाव सपकाळ असे होते परंतु आंबा वडे या त्यांच्या मूळ गावाच्या नावावरून पुढे त्यांचे आडनाव आंबेडकर झाले आणि त्यांच्या कार्यकर्तृत्वाने ते अजरामर झाले त्यांचे वडील सैन्यात सुभेदार होते त्यांचे प्राथमिक शिक्षण दापोली आणि सातारा येथे झाले शिक्षण घेत असताना त्यांना अनेक अपमान जनक प्रसंगाला तोंड द्यावे लागले त्यामुळे जाती म्हणजे जन्मनिष्ट विषमतेवर आधारलेला समाजाबद्दल त्यांच्या मनात चीड निर्माण झाली समाज सुधारण्याची व दलितांच्या उद्धाराची प्रेरणा त्यांना त्यांच्या वडीलाकडून मिळाली बडोदा संस्थानाचे राजे सयाजीराव गायकवाड यांनी डॉ. आंबेडकरांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली अमेरिकेत त्यांनी आपली उच्च शिक्षण पूर्ण केले कायद्याचा अभ्यास करण्यासाठी ते इंग्लंडला गेले बॅरिस्टर होऊन भारतात परत आले आणि खऱ्या अर्थाने दलितांच्या उद्धाराचे कार्य सुरू केले महाड येथील चवदार तळयाचा सत्याग्रह केला व अस्पृश्य समाजात स्वाभिमान निर्माण झाला गोलमेज परिषदेला मागात जातीचे प्रतिनिधी म्हणून ते उपस्थित होते. विधी महाविद्यालयाचे प्राचार्य होते भारताच्या घटना समितीवर ते निवडून आले ते मसुदा समितीचे अध्यक्ष होते भारतीय घटनेचे निर्माते म्हणून कोलंबी या विद्यापीठाने त्यांना डी लीट ही पदवी दिली स्वतंत्र भारताचे कायदेमंत्री म्हणून त्यांनी काम केले. अस्पृश्य समाजाला समता प्राप्त व्हावी यासाठी भारतीय बौद्ध महासभा स्थापन केली 14 ऑक्टोबर 1956 ला नागपूर येथे दीक्षाभूमीवर लाखो

अनुयायासह बौद्ध धर्माचा स्वीकार केला अशा महामानवाचे 6 डिसेंबर 1956 ला महापरिनिर्वाण झाले डॉ.आंबेडकरांवर गौतम बुद्ध कबीर आणि ज्योतिबा फुले यांचा प्रभाव होता.

**सामाजिक लोकशाही:-**

भारतातील पारंपारिक समाज रचना लोकशाहीला पोषक नाही असे आंबेडकरांचे मत होते पारंपारिक समाजा रचनेतून गरीब श्रीमंत असे वर्ग समाजात निर्माण होतात त्यामुळे एकीकडे आणि स्वार्थ वाढीस लागतो तर दुसरीकडे असुरक्षितता स्वातंत्र्य व प्रतिष्ठा यांचा ऱ्हास होतो डॉ.आंबेडकर म्हणतात पारंपारिक सामाजिक रचनेत बदल केल्याशिवाय लोकशाहीची इमारत उभी करता येणार नाही अन्यथा पाया नसलेल्या इमारतीसारखी ती कोसळून पडेल भारतीय समाजात घडवून आणावयाच्या बदलांना ते सामाजिक लोकशाहीची निर्मिती असे नाव देतात सामाजिक लोकशाही अस्तित्वात नसेल तर लोकशाहीच्या सांगाड्याला मुळीच किंमत राहणार नाही त्यांच्या मते राजकीय लोकशाहीची यशस्वीता सामाजिक लोकशाही वर अवलंबून असते काही लोकांना विशेष अधिकार हे लोकशाहीत विसंगत आहे शारीरिक शक्ती आणि बुद्धिमत्ता याबाबत निसर्गतः माणसे विषम असतात म्हणून त्यांना समतेची वागणूक देणे आवश्यक आहे भारतीय राजकीय लोकशाही सामाजिक लोकशाही निर्माण होणे अत्यंत आवश्यक आहे म्हणून सर्वांना समान दर्जा प्राप्त झाला पाहिजे सर्वांच्या प्राथमिक गरजा भागल्या पाहिजे तरच या देशात लोकशाही भक्कमपणे उभी राहू शकेल.

**लोकशाही शासनातील अडथळे:-**

**१) सामाजिक व आर्थिक विषमता:-** ज्या देशात संसदीय शासन पद्धती यशस्वी झाली त्या देशात सामाजिक आणि आर्थिक विषमता होती सामाजिक व आर्थिक समानता निर्माण करण्यास जे देश अपयशी ठरले त्या देशात लोकशाही समाप्त झाली. बहुसंख्या जनतेकडे दुर्लक्ष झाले आर्थिक विषमता कायम राहिली आणि गरिबांची अधिकाधिक पिळवणूक करण्यात आली अशा प्रकारे सामाजिक व आर्थिक विषमता या लोकशाहीच्या अडथळयाची त्यांना जाणीव होती

**२) निरक्षरता किंवा अज्ञान:-** संसदीय लोकशाहीतील निरक्षरता हा महत्त्वाचा अडथळा आहे भारत जेव्हा स्वतंत्र झाला तेव्हा या देशातील एकूण लोकसंख्येत निरक्षणांचे प्रमाण जास्त होते लोक अशिक्षित असतील तर ते चांगले वाईट योग्य योग्य यातील फरक समजू शकत नाही व योग्य वि निर्णय घेऊ शकत नाही.

**३) नवीन पद्धत:-** लोकशाही शासन प्रकार भारतीय जनतेसाठी पूर्णपणे नवीन होता भारतातील लोकांना लोकशाहीचा अनुभव नव्हता लोकशाही या देशांमध्ये रुजलेली नव्हती लोकशाहीच्या यशासाठी जगातील इतर देशात किती संघर्ष झाले याची भारतीय जनतेला जाणीव नव्हती लोकशाही शासन संपूर्णपणे भारतीय लोकांकरीता नवीन होते त्यामुळे त्यात अडथळे येऊ शकतात.

**४) जातीय स्वरूपाचे राजकारण:-** भारतात संसदीय लोकशाही यशस्वी होणार की नाही याबद्दल डॉ. आंबेडकरांना शंका होती. भारतीय समाज जातीवर आधारित आहे जातीची मुळे अतिशय खोलात रुजलेली आहेत ज्या जातींची संख्या अधिक आहे त्यांच्या हाती सत्ता जाऊ शकते आणि अल्पसंख्यांक जातींना सत्तेपासून दूर राहावे लागेल अशा प्रकारची जातीय स्वरूपाचे राजकारणाची पद्धत लोकशाहीसाठी चांगली नाही

**५) अल्पसंख्याकांचा प्रश्न:-** भारतात जातीय स्वरूपाचे राजकारण असल्यामुळे अल्पसंख्यांक समाज दुर्लक्षित राही मंत्रिमंडळामध्ये अल्पसंख्यांकांना सहभागी करून घेण्याचे बंधन बहुसंख्य जनतेवर राहणार नाही त्यामुळे अल्पसंख्या लोकांवर अन्याय होण्याची भीती होती.

**६) विरोधी पक्षांना दडपण्याची वृत्ती:-** लोकशाही यशस्वी होण्यासाठी विरोधी पक्ष अतिशय मजबूत असला पाहिजे विरोधी विचार दडपून टाकणे लोकशाहीसाठी घातक आहे विरोधी पक्ष असणे म्हणजे सत्ताधाऱ्यांवर नियंत्रण होईल आपल्याला हवी असलेले विचार मान्य करणे आणि विरोधी विचार दडपून टाकणे याला लोकशाही म्हणता येत नाही त्यामुळे लोकशाहीचे हुकूमशाहीत रुपांतर होईल दुसऱ्याचे विचार दडपून टाकले जात असतील तर संसदीय लोकशाही व यशस्वी होण्याचा धोका कायम असतो.

**संसदीय लोकशाहीतील अडथळे दूर करण्याचे उपाय:-**

**१) विषमता नष्ट करणे :-** भारतीय समाजात प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेला श्रेष्ठ कनिष्ठ हा भेदभाव नष्ट करणे अत्यंत आवश्यक आहे म्हणजे जातीभेद आणि वर्ग भेद नष्ट करून सामाजिक समता निर्माण करणे आवश्यक आहे तसेच समाजात गरीब आणि श्रीमंत यातील अंतर कमी करणे आणि प्रत्येकाला त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण करता आल्या पाहिजे यासाठी आर्थिक समता निर्माण करणे आवश्यक आहे सामाजिक व आर्थिक क्षमतेमुळे लोकशाही यशस्वी होते

**२) शिक्षण :-** भारत जेव्हा स्वतंत्र झाला तेव्हा निरक्षरतेचे प्रमाण जास्त होते लोकांना शिक्षण देणे आणि शिक्षणाच्या माध्यमातून त्यांच्या सामाजिक व राजकीय जागृती करता येते लोकशाही यशस्वी होण्यासाठी जनता शिक्षित असणे आवश्यक आहे शिक्षणाने जनतेचा दृष्टिकोन व्यापक बनतो योग्य योग्य चांगले वाईट यातील फरक पडतो शिक्षणामुळे जनतेला आपले अधिकार आणि कर्तव्य यांची जाणीव होते.

**३) राष्ट्रीय चारित्र्य:-** लोकशाहीला यशस्वी करण्यासाठी जनतेमध्ये देशप्रेम देशाबद्दल अभिमान व देशासाठी कोणताही त्याग करण्याची तयारी या गोष्टी जनतेने आत्मसात केल्या तर राष्ट्रीय चारित्र्य निर्माण होऊन लोकशाहीला यशस्वी करता येते.

**४) घटनेचा आदर:-** घटनेचा जनतेने आदर करावा घटनेवर देशातील जनतेचा विश्वास असावा त्यामुळे जनतेला कोणतेही परिवर्तन शांततेच्या मार्गाने करता येईल व निर्माण झालेला कोणताही प्रश्न चर्चेच्या माध्यमातून सोडविता येईल यासाठी जनतेने राज्यघटनेचा आदर करणे आवश्यक आहे.

**५) मूलभूत अधिकारांची नोंद:-** मूलभूत अधिकार राज्यघटनेमध्ये लिहिलेले असावे प्रत्येक व्यक्तीला अधिकारांचा उपयोग करून सर्वांगीण विकास करता यावा जनतेच्या अधिकाराचे हनन होणार नाही याकडे न्यायपालिकेने लक्ष द्यावे त्यासाठी न्यायपालिका ही स्वतंत्र असावी व न्याय मंडळांनी घटनेचे रक्षण करावे तसेच मूलभूत अधिकारांचे रक्षण करावे.

**६) अल्पसंख्याकांच्या हिताकडे लक्ष:-** भारतात जातीय स्वरूपाचे राजकारण असल्यामुळे अल्पसंख्यांक जनतेकडे दुर्लक्ष होऊ नये यासाठी त्यांच्या हिताकडे लक्ष द्यावे त्यांना मंत्रिमंडळात योग्य प्रतिनिधित्व मिळावे व हे प्रतिनिधी जनतेच्या विश्वासास पात्र असावे.

अशा प्रकारे संसदीय लोकशाहीतील अडथळे दूर करण्याचे उपाय सांगितले आहे.

**संदर्भग्रंथ**

१) प्रा. रा. ज लोटे "भारतीय राजकीय विचार", पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.

२) प्रा. अरविंद शृंगारपुरे, "भारतीय राजकीय विचार", श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

३) डॉ. भा. ल. भोळे, "भारतीय राजकीय विचार", पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर